**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट                दिनांक – ३०/०६/२०२४

**दि. २९/०६/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी २८९/२०२४भादवी कलम ३९४, ३२३, ५०४,३२४, ३४, |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२८/०६/२०२४ रोजी १४-०० वा. सुमारास फिर्यादी यांचे राहते घर शिवशरण दुबे यांची खोली, रोड नं.२ गणेश नगर, बोपखेल ता. हवेली जि. पुणे, |
| गुन्हा दाखल | :- | दि. २९/०६/२०२४  रोजी २० / ०५ वा |
| फिर्यादी | :- | अश्विन दगडु चौधरी वय ३७ वर्षे, धंदा बेरोजगार, रा. शिवशरण दुबे यांची खोली, रोड नं.२ गणेश नगर, बोपखेल हवेली जि. पुणे, |
| आरोपी | :- | १)पुर्वा अश्विन चौधरी वय ३० वर्षे, रा. मातछाया निवास, गणेश मंदिर शेजारी, बागल यांची खोली, फुगेवाडी, पुणे, २) एक अनोळखी इसम, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची पत्नी आरोपी क्रं १ व तिचे सोबत एक अनोळखी इसम यांनी संगणमत करून फिर्यादीचे घरी येवून अनोळखी इसमाने फिर्यादीस काही एक न बोलता हॉलमध्ये लाथ मारून खाली पाडले व शिवीगाळी करत हाताबुक्याने लाथांनी मारहाण करू लागला त्यावेळी फिर्यादी ओरडु लागले असता आरोपी मजकुर यांनी फिर्यादीचे तोंड धरले. तसेच आरोपी क्रं १ ने आतुन घराचा दरवाजा लावून घेतला सदर मारहाणीस फिर्यादीने विरोध केला असता आरोपी क्रं २ याने पॅन्ट मध्ये कमरेला खोचुन ठेवलेला सुरा काढुन फिर्यादीचे डोक्यावर मारला व पैसे कुठे आहेत असे विचारू लागला त्यावेळी फिर्यादी काही सांगत नाही या कारणाने आरोपी क्रं २ याने पुन्हा सुरा फिर्यादीचे डोक्यावर मारला त्यावेळी फिर्यादीचे डोक्यातुन मोठया प्रमाणात रक्त वाहु लागले. तसेच आरोपींनी फिर्यादीस ओढत किचन मध्ये नेले व तेथील डबे शोधुन किचनमध्ये ॲल्युमिनीयमचे डब्यात ठेवलेले १,००,०००/- रूपये व फिर्यादीचा वापरता ५०००/- रु किं चा सॅमसंग कंपनीचा मोबाईल जबरी चोरी करून घराचे मागचे दरवाजातुन निघून गेले. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि अंभोरे सो ,८४५४०११०५२ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ४१६/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२७/०६/२०२४ रोजी २०:०० वा. चे सुमारास आरोपी दत्ता सावंत यांचे घराजवळ, पाळू गाव,गुरव वस्ती तालुका.खेड जिल्हा पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०६/२०२४ रोजी २१.२७ वा |
| फिर्यादी | :- | बाळु चिचाबा सावंत वय ६० वर्षे व्यवसाय मजुरी रा. पाळू, ता. खेड, जि. पुणे |
| आरोपी | :- | १)दत्ता कैलास सावंत वय अंदाजे २२ वर्षे रा. मु.पो.पाळू ता.खेड जिल्हा पुणे.<br>२) सुशांत गोंगे वय अंदाजे २१ वर्षे रा.मु.पो.पाईट गाव, ता.खेड जिल्हा पुणे.<br>३) गौरव खेंगले वय अंदाजे २० वर्षे रा.मु.पो.पाईट गाव, ता.खेड जिल्हा पुणे<br>४) दिपक खेंगले वय २३ वर्षे अंदाजे रा. मु.पो.पाईट गाव, ता.खेड जिल्हा पुणे<br>**आरोपी क्रं १,३,४ अटक आहेत** |
| तपशिल | :- | नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना कैलास सावंत याचा मुलगा आरोपी क्रं १ याने बोलाविले वरुन फिर्यादी यांनी दुपारी कैलास सावंत व मेव्हणी आरुणा सावंत याचे जागेवरुन भांडणे चालू असताना, त्यांची भांडणे सोडविली होती त्याकारणावरुन फिर्यादी यांना बोलाविले असेल असे वाटल्याने फिर्यादी हे सदर ठिकाणी गेले असता आरोपी क्रं १ हा फिर्यादी यांना म्हणाला की, तू माझ्या वडीलांना दुपारी काय बोलला असे बोलून आरोपी क्रं १ याने त्याचे उजव्या हातातील स्टीलचे कडयाने फिर्यादी यांचे डावे डोळयाचे शेजारी कपाळाजवळ कडा मारुन त्यांना जखमी केले व त्याचे मित्र आरोपी क्रं २ ते ४ यांनी ही फिर्यादी यांना शिविगाळ देत हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन फिर्यादी यांना जखमी केल्याने गुन्हा दाखल |

त.अधिकारी/अंमलदार :- पो.हवा./१३४५ चासकर ९५९४९८९८४८

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ४५९/२०२४ भा द वि क २७९, ३०४(अ) मो वा का क १८४,१३४/१७७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२९/०६/२०२४ रोजी १८/१० वा चे सुमा मौजे मोहीतेवाडी गावचे हददीत चाकण शिक्रापुर रोड मोहितेवाडी चौक ता खेड जि पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२९/०६/२०२४ रोजी २०/४८ वा

फिर्यादी :- बाबाजी लक्ष्मण मोहिते वय ४१ वर्षे धंदा-शेती,रा मोहितेवाडी,ता खेड जि पुणे

आरोपी :- अज्ञात चालक

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी मोहीतेवाडी गावचे हददीत चाकण शिक्रापुर रोड मोहितेवाडी चौक येथे ता खेड जि पुणे येथे अज्ञात गाडीवरील चालकाने चाकणकडुन शिक्रापुर कडे जात असताना फिर्यादी यांची चुलती नामे सिंधुबाई केरबा मोहिते,वय ७५ वर्षे रा सदर ही पायी रस्त्यावरून जात असताना तिस अज्ञात गाडीने जोरात धडक देवुन ती खाली पडल्याने अज्ञात गाडीचा चाक तिचे कंबरेच्या खाली दोन्ही पायावरून जावुन गंभीर मार लागुन जखमी करून तिचे मृत्युस कारणीभुत झाला व अज्ञात वाहन अपघात ठिकाणी न थांबता निघुन गेला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मसपोनि गावडे ९८७०५४८०४३

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ३२९/२०२४ भा.द.वि.कलम ४२०.प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०९/०६/२०२४ रोजी सायंकाळी १८/१६ वा. ते २०/३० वाजे पर्यंत शाहुनगर, चिंचवड,

गुन्हा दाखल :- दि.२९/०६/२०२४ रोजी १९/४३ वा

फिर्यादी :- पुरूष फिर्यादी वय-५६ वर्षे, धंदा-नोकरी, रा, शाहुनगर,चिंचवड,पुणे

आरोपी :- मोबाईल नंबर९८३५५३५९०९/६३६२१०६५१४ धारक अज्ञात इसम **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घरी असताना यातील आरोपी याने फिर्यादी यांचे एम.एन.जी.एल.गॅस कनेक्शन हेल्डअप झाले असल्याने रजिस्ट्रेशन प्रोसेस करावी लागेल.असे सांगुन व त्याच्या कंपनीची व स्वतःची बनावट माहिती सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन, आरोपी याने त्याचा मो.नं.नंबरवरुन फिर्यादी यांचे वॉट्स ॲपला MNGL Gas Bill Update.apk हि लिंक पाठवुन ओपन करायला सांगुन, नेट बँकीगद्वारे पाच रुपये पाठविण्यास भाग पाडले व त्याद्वारे फिर्यादी यांचा मोबाईल व फिर्यादी यांचे बँकखाते हॅक करुन फिर्यादी यांचे संमत्तीशिवाय बँक खात्यामधील एकुण. ६,०६,४८६/- रुपये एवढी रक्कम काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- मसपोनि गोडबोले ८७८८२५२५६५

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ३६७/२०२४, भा.द.वि कायदा कलम ४१९,४२० माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी), ६६(डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १९/०६/२४ रोजी ते दिनांक २७/०६/२४ फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन

गुन्हा दाखल :- दि २९/०६/२०२४ रोजी १९.४७ वा

फिर्यादी :- पुरूष फिर्यादी वय ६० वर्षे , धंदा – नोकरी, रा -, चिंचवड, ता हवेली, रा पुणे.

आरोपी :- मोक्र ८६०५००५५५५, ८०६८०५९१३० **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना त्यांच्या मोबाईल क्रं यावर मोक्र ८६०५००५५५५,८०६८०५९१३० यावरुन फोन आले व ते एम.एन.जी.एल मधुन बोलत आहे असे खोटे सांगुन तुमचे बिल पेंडिग आहे ते भरण्यासाठी फिर्यादीकडुन त्यांच्या डेबिट कार्डच्या डिटेल्स शेअर करायला सांगुन फिर्यादीचा मोबाईल, ई मेल आय डी हॅक करुन त्यांच्या वेगवेगळया बँकेतील खात्यातुन पैसे ट्रान्सफर करुन घेवुन फिर्यादी यांची एकुण १२,०३,८०९.८/- एवढया रकमेची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि साळुंखे ९५९४७७४२३८

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ४१५/२०२४ भादवि कलम ४३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२९/०६/२०२४ रोजी ००/१५ सुमारास बोरदरागावचे हद्दीतील फिर्यादी यांचे रहाते घरा समोरील आंगणा मध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०६/२०२४ रोजी ०४/४२ वा |
| फिर्यादी | :- | जयश्री देवीदास पडवळ वय ४१ वर्ष धंदा.गृहीणी रा. बोरदराता.खेड जि.पुणे |
| आरोपी | :- | पृथ्वी देवीदास पडवळ वय २४ वर्ष सध्या रा. वडमुखवाडी ता.हवेली जि,पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील यातील फिर्यादी यांचा मुलगा नमुद आरोपी हा वारंवार फिर्यादीला त्याचा हिस्सा व पैसे मागत असुन आम्ही त्याला त्याचा हिस्सा व त्याला पैसे न दिल्यामुळे त्याने बोरदरा येथे फिर्यादीचे घरी येवुन घरा समोरील आंगणातील शेडमध्ये ऊभी केलेली वेन्यु<br>चारचाकी गाडी क्र.एम.एच.१४/के.एस.६२५२ हिला आग लावुन सदर गाडी पेटवुन गाडीचे व रहाते घराचे खिडकीचे तसेच घरातील खुर्चीचे जाळुन नुकसान केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा जायभाये ८२०८९९०५६० |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ८०४/२०२४ भा.द.वि.क. ४०८ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०६/२०२४ रोजी व त्यापुर्वी ६ महिने माझ्या गोल्डन केअर हॉस्पीटल भुमकर चौक वाकड पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०६/२०२४ रोजी २३.२३ वा |
| फिर्यादी | :- | डॉ. किरण रंगराव मुळे वय-४३ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा. सी./१०३, रॉयल ग्लोरी भुमकर वस्ती वाकड पुणे |
| आरोपी | :- | पायल लक्ष्मण जाधव रा. वाल्हेकरवाडी चिंचवड पुणे रा. वाल्हेकरवाडी चिंचवड पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे गोल्डन केअर हॉस्पीटल भुमकर चौक वाकड पुणे येथे नमुद महिला आरोपी हीस हॉस्पीटलमध्ये फ्रंट डेस्क स्टाफ म्हणुन नोकरीस असताना फिर्यादी यांच्या गोल्डन केअर हॉस्पीटल मध्ये उपचार केल्यानंतर पेशंटकडुन येणारी रक्कम आमच्या हॉस्पीटलच्या बॅक खात्यावर न घेता आरोपी स्वतःच्या कोटक महिंद्रा बॅक खाते क्रमांक ८७४६३३१५५६ आय.एफ.एस.सी कोड केकेबीके ०००७२५ व महाराष्ट्र बॅकेचे खाते क्रमांक ६०१४०७८१३८० आयएफएससी कोड एमएएचबी ००००१२७ या खात्यावर वेळोवेळी घेवून एकुण खात्यांवर एकुण ३,७८,२४०/- रुपये ट्रान्सफर करून घेवून विश्वासाने दिलेल्या रकमेचा अपहार केला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | शितल गिरी पोलीस उप निरीक्षक, ८४४६७१४०३५ |